अत्यंत महत्वाचे

परिपत्रक नं. ५/९९

क्र. औवशा/सऔव/नोंदणी/ ९९ / बी-२०४७६
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन
भवन, मंत्रालय समोर, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २३ एप्रिल १९९९.

**विषय : सहकारी औद्योगिक वसाहतींच्या नोंदणी व इतर कामकाजाबाबत.**

सन १९६७ पासून सहकारी औद्योगिक वसाहतींची प्रशासकीय / आर्थिक प्रकरणे प्रामुख्याने उद्योग संचालनालय, मुंबई तसेच महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, यांच्या मार्फत हाताळली जातात. तसेच या वसाहतींच्या संदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्थाचे अधिनियम १९६० व नियम १९६१ खालील प्रकरणे सह निबंधक सहकारी संस्था (सऔव) मुंबई तसेच तालुका सहाय्यक निबंधक / उप निबंधक व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे मार्फत हाताळली जातात. अलिकडे या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या निवेदनावरुन असे आढळून आले आहे की, सहकारी औद्योगिक वसाहतींच्या नोंदणीच्या अधिकाराबाबत काही तालुका सहाय्यक निबंधक/ उपनिबंधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्यामध्ये संदेह आहे व त्यामुळे सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करु इच्छिणाऱ्या लोकांची अडचण होत आहे. या संदर्भातले सर्व संदेह निराकरण करण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

१) सहकारी औद्योगिक वसाहतींच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० खालील नोंदणीचे अधिकार सह निबंधक, सहकारी संस्था (सऔव) तसेच तालुका सहाय्यक निबंधक/उपनिबंधक/जिउनि यांनाही आहेत. या बाबत यापूर्वीही सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. अप्पर निबंधक (त.व.नि.) यांच्या पत्र क्र. औद्योगिक/सी१/०३/औद्यो.सह वसाहत /नोंदणी/ ९५, दिनांक ३१ जुलै १९९५ परिपत्रकाचा हवाला देऊन सहकारी औद्योगिक वसाहतींचे नोंदणी करण्यास कांही तालुका सहाय्यक निबंधक/उपनिबंधक नकार देतात. तथापि सदर परिपत्रक हे एखाद्या सहकारी औद्योगिक वसाहतींची नोंदणी सह. निबंधक सहकारी संस्था (सऔव) यांनी केल्यास सदर संस्थे बाबत नोंदणी नंतरची वैधानिक कामे पार पाडण्यासाठी सह. निबंधक सहकारी संस्था (सऔव) यांना तालुका सहाय्यक/उपनिबंधक/जिउनि यांनी सहाय्य करण्याबाबतचे आहे. सदर परिपत्रका अन्वये किंवा अन्य कुठल्याही आदेशान्वये तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक / जिऊनि यांचे सहकारी औद्योगिक वसाहतींची नोंदणी करण्याचे अधिकार काढूण घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पुन्हा खुलासा करण्यात येत आहे की, सहकारी औद्योगिक वसाहतीची नोंदणी सह निबंधक सहकारी संस्था (सऔव), मुंबई यांच्या बरोबरच तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक / जिल्हा उप निबंधक यांनीही करावयाची आहे.

२) सहकारी औद्योगिक वसाहतींच्या नोंदणीसाठीचे विहित निकष यापूर्वी सर्वांना कळविले आहेत. तथापि याबाबतही कांही ठिकाणी अद्याप सुस्पष्ट कल्पना नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. म्हणून पुन्हा कळविण्यात येत आहे की, सहकारी औद्योगिक वसाहतीच्या नोंदणीसाठी विहित निकष खालीलप्रमाणे आहेतः

अ) किमान सभासद १० (दहा)

ब) किमान सभासद भाग भांडवल रु. १०,०००/- (दहा हजार)

क) किमान जमीन २ (दोन) एकर

३) सहकारी औद्योगिक वसाहतींच्या नोंदणी प्रकल्पाची छाननी करण्यासाठी वापरावयाची सूची या कार्यालयाच्या परिपत्रक क्र. १७/७४ क्र. औवशा/ नोंदणी /९३/बी-१२८७० दिनांक ११.७.९४.तसेच परिपत्रक क्र. १५/९८ क्र.औवशा/नोंदणी /९८/ सी ५९३९९ दिनांक ३१/१०/९८ अन्वये सर्वांना पाठविण्यात आली आहे. त्यानुसार प्रकरणाची छाननी करुन संस्थेची नोंदणी करण्यात यावी.

वरील खुलाशानंतरही सहकारी औद्योगिक वसाहतींच्या नोंदणी बाबत/कामकाजाबाबत कुणाला काही संदेह असल्यास त्यासंबंधी त्यांनी या कार्यालयाकडे विचारणा करावी. बाब निकडीची असल्यास दूरध्वनी क्रमांक २०२३९१२ वर सह निबंधक सहकारी संस्था (सऔव) किंवा त्यांचे सहाय्यक अधिकारी / कर्मचारी यांचेशी संपर्क साधावा.

**सही/-**

**रा. वि. तिरोडकर**

सह. निबंधक सहकारी संस्था (सऔवा)

**प्रत माहितीसाठी रवाना –**

१) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था :-

२) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था :-

३) उद्योग सह संचालक/अधिक्षकीय उद्योग अधिकारी,ठाणे, नाशिक,पुणे, औरंगबाद, अमरावती, नागपूर (सर्व)

४) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ................ जि.................... (सर्व)

५) चेअरमन, महाराष्ट्र राज्य सहकारी औद्योगिक वसाहत फेडरेशन लि., सांगली.
द्वारा औद्योगिक वसाहत, सांगली ४१६ ४१६.